# बृहन्मुंबई महानगरपालिका

सहा.आयुक्त 'ए' विभाग यांचे कार्यालय, १३४-ई, श.भ.सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१

क्र.सहा.आ/ए/ ०१५८९ /ओडी/परिरक्षण, दिनांक: ०२ / १२ /२०२५

## स्थळ दरपत्रिका सुचना

दिनांक ०१.१२.२०२५ रोजी माजिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या दालनात दिनांक ०६.१२.२०२५ रोजी भारतरत्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त करावयाच्या उपाय-योजना बाबत बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण निमित्त दिनांक ०५.१२.२०२५ व ०६.१२.२०२५ रोजी के. बी. पाटीलमार्ग व मादाम कामा मार्ग जंक्शन येथील वाहतूक बेटामधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे दादर, चैत्यभूमी स्मारक येथील थेट प्रक्षेपण करणे करीता एलईडी स्क्रिन उभारणे व सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याची विनंती डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे पदाधिकारी यांनी मान. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना केली. सदर प्राप्त विनंतीच्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी पुढील यथोचित कार्यवाही करण्याचे निर्देश उपस्थितांना दिले.

सदर प्राप्त निर्देशाच्या अनुषंगाने प्रस्तावित कामांची वर्गवारी निहाय यादी तयार करुन, या विभागामार्फत सन २०२४ मध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त तत्सम प्रकारच्या कामाकरीता देण्यात आलेला कार्यादेशाच्या आधारावर प्रस्तावित कामांस रु.२,१८,३००/- इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

सबब,'ए' विभागातील के.बी. पाटील मार्ग व मादाम कामा मार्ग जंक्शन येथील वाहतूक बेटामधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे दिनांक ०५.१२.२०२५ ते ०६.१२.२०२५ रोजीपर्यंत भारतरत्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादर चैत्यभूमी येथील थेट प्रक्षेपणासाठी स्क्रिन आणि सीसीटीव्ही यंत्रणा बसविणेकरिता, सदर कामांचा अनुभव असलेल्या कंत्राटदारांकडून स्थळदरपत्रिका पात्रता निकषानुसार मागविण्यात येत आहेत. सदर कामाची माहीती खालीलप्रमाणे;

| अ.नु. | विषय | अंदाजित रक्कम (सर्व कर सहित) |
|---|---|---|
| १ | Providing & fixing CCTV along with LED TV and Screen for Live streaming of Dadar Chaityabhumi at the junction of Madam Cama Road & K.B. Patil Marg for death anniversary of Dr. Babasaheb Ambedkar on 05.12.2025 to 06.12.2025 in 'A' Ward. | रु.२,१८,३००/- |

पात्रता व निकष :

१. बृहन्मुंबई महानगरपालिका नोंदणीकृत कंत्राटदार असणे आवश्यक.
२. समान कामाचा अनुभव असणे आवश्यक.

सबंधित कंत्राटदाराने उपरोक्त पात्रता व निकषाच्या आधारे सहा.आयुक्त 'ए' विभाग यांचे कार्यालय, १३४-ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ या ठिकाणी स्थळदरपत्रिका भरण्याची कालावधी (दिनांक ०३.१२.२०२५ – सकाळी ११:०० ते दिनांक ०४.१२.२०२५ – सकाळी ११:०० पर्यंत व त्याच दिवशी दिनांक ०४.१२.२०२५ रोजी दुपारी ०१:०० वाजता प्राप्त मोहोरबंद स्थळदरपत्रिका उघडण्यात येईल.)

सही/-

सहाय्यक आयुक्त 'ए' विभाग